
ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार १७ एप्रिल, १९६८ | अंक ८




सदैव
सुंदर पोषाखात
राहण्यासाठी
ठाकरसीचे
everfresh
इतरांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेऊ इच्छिणारे लोक 'एव्हरफ्रेश' (६७% 'टेरीन', ३३% सुती धागा असलेले) कापडावर बेहद्द खूष आहेत. वॉश 'एन्' वेअर-(धुवा नी वापरा) प्रकारच्या कापडातील सर्वोत्तम कापड-साधे अथवा फ्रिटेड आणि चुणी-रोधक मुद्दा; म्हणूनच तर ते सदा सुंदर राहते-एव्हर फ्रेश।
तसेच १००% सुती कापड -
TEBILIZED
चुणी-रोधक गुणात कसोटी सिद्ध
आणि शर्टिंग, सूटिंग, स्क्रीन प्रिन्टस् पॉपलीन, वायल केम्ब्रिक, जेकार्ड व खोळींचे वगैरे तऱ्हेतऱ्हेचे कापड
दी हिंदुस्तान स्पिनिंग ॲण्ड वीव्हिंग मिल्स् कं. लि.
दी इंडियन मॅनुफॅक्चरिंग कं. लि.
१९, अपोलो स्ट्रीट, मुंबई - १
ठाकरसी ग्रूप
सुंदर सुती कापडाचे उत्पादक
TM-100

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १७ एप्रिल, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## वर्णभेदाच्या अभ्यासकाचा गंभीर इषारा

अमेरिकेतील निग्रो वंशाच्या लोकांचे अहिंसावादी पुढारी डॉ. मार्टिन ल्यूथर किंग ह्यांचा अलीकडे खून झाला. त्यामुळे अमेरिकेत धुमसत असलेल्या वर्णभेदाने हिंसक स्वरूप पुन्हा धारण केले. तेथील वर्णभेदाच्या इतिहासाचे सखोल स्वीडिश अभ्यासक मि. गुनार मिरडल ह्यांनी वर्णभेदाविषयी अमेरिकेला गंभीर इषारा दिला आहे. लॉस एंजलेस टाइम्स ह्या पत्राला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात की डॉ. किंग ह्यांचा खून ही एक महाभयंकर घटना आहे. आपल्या मताचे निर्भयपणे प्रतिपादन करणाऱ्या कोणाही माणसाचा खून करण्याची घातकी प्रथा अमेरिकेत पडण्याची भीती त्यामुळे उत्पन्न झालेली आहे. ही भीती भविष्यकाळाविषयी चिंता उत्पन्न करणारी आहे. मानसिक दृष्ट्या विकृत असणारे लोक कोणत्याही समाजात असतातच; त्याप्रमाणे ते अमेरिकेतही आहेत. एखाद्या सार्वजनिक कार्य करणाऱ्या माणसाचा खून करून स्वतःला सन्माननीय स्थान मिळेल असे त्यांना वाटते. अशी घातकी प्रथा अमेरिकेत पडली तर प्रत्येकाला अध्यक्ष जॉन्सन ह्यांच्याप्रमाणे प्रवास करावा लागेल, म्हणजे गुप्तपणे वावरावे लागेल आणि पोलिसांचे संरक्षण घ्यावे लागेल. तथापि अमेरिका वर्णभेदाचा प्रश्न सोडवू शकणार नाही असे मात्र नाही. पण हा प्रश्न अतिशय बिकट आहे. तो सोडवण्यासाठी अमेरिकेला कोट्यवधी डॉलर्स खर्च करावे लागतील आणि एका पिढीला तरी संपूर्णपणे त्यासाठी झटावे लागेल. हा प्रश्न हिंसाचाराने सुटणार नाही हे डॉ. किंग ह्यांचे मत अगदी बरोबर आहे. अमेरिकेत कोणाही माणसाला घातक हत्यारे विकत घेता येतात. अशी परवानगी असणे म्हणजे मूर्खपणाचा कडेलोट आहे.

---

## शेतीच्या व्यवसायाला भरघोस यश

भारताचे माजी अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् न्यूयॉर्कमध्ये भरविण्यात आलेल्या परिसंवादात म्हणाले की, अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी भारताने जे उपाय योजले आहेत त्यांना भरघोस यश येत आहे. त्यामुळे भारत आता शेतीच्या बाबतीत एका नव्या अवस्थेप्रत पोचला आहे. चालू हंगामात देशातील अन्नधान्याचे उत्पादन सर्वांत अधिक म्हणजे १ कोटी टनापर्यंत होईल अशी अपेक्षा आहे. शेतीच्या बाबतीत १९६४-६५ साली क्रांतिकारक बदल घडवून आणणारा कार्यक्रम आखण्यात आला व त्याची अंमलबजावणीही सुरू झाली. सुधारलेले व अधिक पिके देणारे बी-बियाणे वापरण्यात येऊ लागले आणि रासायनिक खतांचा वापरही मोठ्या प्रमाणावर करण्यात येऊ लागला. भारतात शेतीविषयक संशोधनास जोराची चालना देण्यात आली. त्यापूर्वी शेतीची परंपरागत पद्धत सोडून नवीन पद्धत स्वीकारणे भारताला शक्य झाले नाही. भारतामधील हवापाण्याला अनुकूल असे बीबियाणे त्यापूर्वी उपलब्धच नव्हते. अर्थातच, परंपरागत पद्धत सोडण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. हिंदमधील मागासलेला शेतकरी उत्पादनाचे आधुनिक तंत्र योग्य तऱ्हेने वापरू शकतो ह्याविषयी आता शंका राहिलेली नाही.

---

## अर्थव्यवहार *

अर्थव्यवहाराचा हा अंक कॉमर्स कॉलेजांच्या वार्षिकांना आदर्श असाच निघाला आहे; कारण त्यात कॉलेजातील प्राध्यापकांचे आणि विद्यार्थ्यांचे लहान-मोठे उपक्रमच केवळ सांगितलेले नसून आर्थिक विषयांवर माहितीपूर्ण असे लेखही त्यात दिलेले आहेत; प्राचार्य आणि दोनही उपप्राचार्य (डॉ. एन. के. कुलकर्णी, डॉ. पी. सी. शेजवलकर आणि प्रा. पी. व्ही. पटवर्धन) ह्यांच्या लेखांप्रमाणे इतरही कित्येक प्राध्यापकांच्या लेखांनी अंकाला भूषविले आहे. संपादकांनी आपल्या स्फुटातही देशातील आर्थिक प्रश्नांची समतोलपणे चर्चा केली आहे. कॉमर्स कॉलेजातील विद्यार्थी साहित्य क्षेत्रातही किती रमतात, हे विशेषतः मराठी, हिंदी व गुजराती विभागातील त्यांच्या विलासावरून दिसून येते.

कॉलेजचे एक प्रमुख संस्थापक आणि पहिले प्राचार्य, प्रा. द. गो. कर्वे, ह्यांच्या स्मृतीस संपादकांनी आदरांजली अर्पण केली आहे. प्रा. कर्वे ह्यांनी कॉलेजचा व्यापारी व औद्योगिक जगाशी घनिष्ठ संबंध निर्माण करून वाढविला होता. ही त्यांची महत्त्वाची कामगिरी आम्हांस नमूद करावीशी वाटते.

---

* बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सचे वार्षिक
संपादक : प्रा. पी. व्ही. पटवर्धन

## अमेरिकेतील हिंदी लोक व व्हिएटनाममधील युद्ध

अनेक परदेशीय नागरिक अमेरिकेत जाऊन तेथेच स्थायिक होण्याचा प्रयत्न करतात. त्यांपैकी ज्या नागरिकांना अमेरिकेत राहण्याचा कायमचा परवाना मिळालेला आहे त्यांना लष्कर भरतीच्या बोर्डाकडे आपले नाव नोंदवून घ्यावे लागते. अमेरिकेत कायमचे राहावयाचे असेल तर ह्या नोंदणीतून सुटका नाही. हिंद-मधील अनेक नागरिक अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत; त्यामुळे व्हिएटनाममधील युद्धात सैनिक म्हणून त्यांना काम करावे लागण्याची शक्यता आहे. जे परदेशीय नागरिक तात्पुरत्या परवान्यावर अमेरिकेत गेलेले असतात त्यांच्यावर मात्र लष्करी नोकरीसाठी नोंदणी करून घेण्याची सक्ती नाही. एखाद्या परदेशी नागरिकाने अशी नोंदणी करून घेण्यास नाखुषी दाखविली तर त्याला आपल्या मायदेशाला परत यावे लागते. अमेरिकेत राहण्याचा कायमचा परवाना असेल तर अशा नागरिकाला तेथे नोकरी करता येते. त्याशिवाय अमेरिकन नागरिकांना असणारे इतर हक्कही त्यांना प्राप्त होतात. तथापि निवडणुकांत मत देण्याचा अगर उमेदवार म्हणून उभे राहण्याचा हक्क मात्र मिळत नाही. कायम परवाना मिळाल्यावर ज्याप्रमाणे काही हक्क प्राप्त होतात त्याचप्रमाणे काही जबाबदाऱ्याही परदेशीय नागरिकांना पत्कराव्या लागतात. अशा जबाबदाऱ्यांत सरकार बोलावील त्यावेळेला लष्करात दाखल होण्याची जबाबदारीही येते. कायम परवाना मिळाला तर ज्यांना तो मिळाला असेल त्यांना संपूर्ण अमेरिकन नागरिकत्व प्राप्त करून घेण्यासाठी त्याचा फायदा होतो. तथापि, पुष्कळ परदेशी नागरिक कायम राहण्याचा विचार नसताही कायम परवाना मागतात.


---

## दक्षिण आफ्रिकेचे सोन्याबाबत धोरण

युरोपमधील सोन्याच्या बाजारात काही दिवसापूर्वी सोन्याच्या खरेदीची लाट उसळली होती. त्यावेळी दक्षिण आफ्रिकेचे सोन्याच्या विक्रीसंबंधी काय धोरण राहील ह्याविषयी काही सांगता येत नव्हते. सोन्याच्या बाजारात सट्टा स्वरूपाची सोन्याची खरेदी चालू आहे तोपर्यंत खुल्या बाजारात सोने न विकण्याचा निर्णय दक्षिण आफ्रिकेने घेतला आहे. दक्षिण आफ्रिकेत जगातील इतर देशांपेक्षा सर्वात अधिक सोन्याचे उत्पादन होते. त्यामुळे त्या देशाच्या धोरणाला साहजिकच महत्त्व प्राप्त होते. तेथे उत्पादन करण्यात येणारे सर्व सोने तेथील रिझर्व्ह बँक विकत घेते. सोने विकण्याचा निर्णय घेणे जरूरीचे वाटल्यास ज्या देशांना तारण म्हणून ते हवे असेल त्यांना एका औंसाला ३५ डॉलर्स ह्या दराप्रमाणेच विकण्यात येईल असा खुलासा करण्यात आला आहे.

---

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक ' अर्थ '
किंमत ५० पैसे.

अधिक धान्योत्पादन!
अधिक फायदा!!
अधिक बचत!!!
यांसाठी
किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
यांचीच निवड आवश्यक आहे....
कारण, अत्यंत कार्यक्षम व बिनतक्रार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिनें, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यांस उपयुक्त आहेत. किर्लोस्कर एंजिनें चालविण्यांस लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सला लागणाऱ्या खर्चाच्या मानानें फारच कमी येतो.

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि, सातारा

### वार्षिक सभेत श्री. रा. ना. गोडबोले ह्यांचे अध्यक्षीय भाषण

व्यापारी बँकांवर सामाजिक नियंत्रण घालण्यासंबंधीचे बिल सध्या संसदेपुढे आहे. सर्व बँकिंग कंपन्यांच्या संचालक मंडळाचा अध्यक्ष हा पूर्ण वेळ काम करणारा असा असावा व त्याचेवर बँकेच्या सर्व दैनंदिन कारभाराची जोखीम असावी अशा प्रकारची तरतूद सदर बिलात आहे. कोणत्याही संस्थेत दुहेरी जबाबदारीची पद्धत असणे हेच त्या संस्थेच्या आणि संस्थेमध्ये हितसंबंध असलेल्या सर्वांच्या हिताचे असते. अशा प्रकारे दोन निरनिराळ्या व्यक्तींवर जबाबदारी टाकली गेल्यास त्यामुळे एकमेकांना मदतच होते. बँकेसारख्या संस्थेमध्ये संचालक मंडळाचा अध्यक्ष आणि दैनंदिन कारभारास जबाबदार असलेला अधिकारी ( चीफ एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर ) या दोन्ही व्यक्ती एकच असू नयेत. रिझर्व बँकेने या बाबतीत लवचिक धोरण स्वीकारले असून बँकांच्या आकारमानाकडे पाहून वरील बिलातील तरतुदींची अंमलबजावणी करताना सवलती देण्याचे सदर बँकेने ठरविले आहे. आपल्याही बँकेच्या बाबतीत अशा तऱ्हेची सवलत आपल्याला मिळणार आहे.

केंद्र सरकारने नुकतेच नॅशनल क्रेडिट कौन्सिल स्थापन केलेले असून त्यामध्ये निरनिराळ्या क्षेत्रांना प्रतिनिधित्व दिलेले आहे, ही घटना स्वागतार्ह आहे. या कौन्सिलमध्ये रिझर्व बँक व व्यापारी बँकांचेही प्रतिनिधी आहेत. व्यापारी बँकांच्या कर्जविषयक धोरणासंबंधी हे कौन्सिल आदेश देणार असल्याने त्या वेळी लहान बँकांच्या अडचणींचाही सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल अशी मी आशा करतो. सदर कौन्सिल कर्जविषयक आणि विशेषतः शेतीला द्यावयाच्या कर्जासंबंधी धोरण ठरविताना त्याबाबतच्या सहकारी बँकांच्या थकबाकीविषयक अनुभवाचा विचार करील अशी अशा आहे. त्या दृष्टीने शेतीला कर्जपुरवठा करण्यासंबंधी धोरण ठरविताना व्यापारी बँकांना कर्जवसुलीबाबतचे सर्व अधिकार दिले जावेत. व्यापारी बँकांच्या खेळत्या भांडवलापैकी फारच मोठा हिस्सा ठेवीदारांचा असतो. त्या दृष्टीने ठेवीदारांच्या हिताची जपणूक होईल असेच कर्जविषयक धोरण ठेवले जाणे अत्यावश्यक आहे.

रिझर्व बँकेने नुकताच बँक रेट एक टक्क्याने कमी करून तो पाच टक्क्यांवर आणला आहे. याचा सुयोग्य परिणाम लागलीच दिसून आला. पैसा स्वस्त दराने उपलब्ध करून देण्याचे जे नवीन धोरण सरकारने स्वीकारले आहे तेही स्वागतार्ह आहे. यंदाचे केन्द्र सरकारचे अंदाजपत्रक, बँक रेट कमी करणे वगैरे गोष्टींमध्ये जी सुसूत्रता आढळते ती निश्चितच स्वागतार्ह आहे.

अहवालसाली बँकेच्या नोकरांना ग्रॅच्युइटी देण्याकरिता एक स्वतंत्र ट्रस्ट स्थापन केलेला असून त्या ट्रस्टकडे रु. ५०,००० वर्ग केलेले आहेत. यापुढेही दरवर्षी जमेल तसतशी रक्कम वर्ग केली जाईल.

माझ्या गेल्या वर्षीच्या भागधारकांच्या सभेपुढील भाषणात उल्लेख केल्याप्रमाणे दि वेस्टर्न इंडिया आणि एक्झीक्युटर कंपनी लिमिटेड ही आता आपल्या बँकेची पूर्णपणे सब्‌सिडिअरी कंपनी झाली आहे हे सांगण्यास मला अत्यंत आनंद वाटतो.

या दोन्ही संस्था एकमेकांना पूरक ठरतील याविषयी मला खात्री वाटते.

अहवालसाली बँकेने पांचगणी, सोलापूर व यावल येथे तीन नवीन शाखा उघडल्या. यावल ही खानदेशातील आपली पहिलीच शाखा आहे. चालू साली औरंगाबाद, अष्टे व इतर ठिकाणी बँक शाखा उघडणार आहे.

अहवालसाली बँकेच्या ठेवींमध्ये रु. ८७,५१,४९९ ची वाढ झालेली असून तिचे प्रमाण जवळजवळ १५ टक्के पडते. सर्व बँकांमध्ये सन १९६७ मध्ये ठेवीत सर्वसाधारणपणे १० टक्के वाढ झालेली आहे. हे पाहता आणि विशेषतः इतर काहीं बँका आपल्या बँकेपेक्षा ठेवीवर फार जास्त व्याजाचा दर देऊन आपल्याशी स्पर्धा करीत आहेत ही गोष्ट विचारात घेता आपल्या बँकेच्या ठेवींमधील वाढ समाधानकारक आहे. बँकेच्या एकूण ६५,४३८ ठेवीदारांपैकी ६३,१८९ ठेवीदारांच्या रकमा रु. ५,०००पेक्षा कमी आहेत व अशा ठेवीदारांच्या एकूण ठेवी रु. ३,६९,७८,००० च्या आहेत. म्हणजेच ९६ टक्के ठेवीदार लहान ठेवीदार असून एकूण ठेवीपैकी ५४ टक्के ठेवी अशा ठेवीदारांच्या आहेत.

आपली बँक हळूहळू परंतु निश्चितपणे प्रगतीपथावर जात आहे. आपण आपला पाया भक्कम करून त्यावर प्रगतीची इमारत बांधत आहोत. बँकेवरचा भागधारक, ठेवीदार, खातेदार व इतर हितचिंतक यांचा विश्वास व लोभ वाढत आहे हे नमूद करण्यास मला मोठा अभिमान वाटतो. बँकेच्या प्रगतीत तिच्या नोकरवर्गाचाही फार मोठा वाटा आहे यात शंकाच नाही.

सर्वसाधारण सभेने श्री. श्री. शं. साठे आणि श्री. मु. प्र. दावके ह्यांची संचालक म्हणून फेरनिवड केली.

### सहकारी सोसायट्यांची १९४ लक्ष रु. ची निर्गत

सहकारी सोसायट्यांनी जून, १९६७ असेरच्या सहकारी वर्षात १९४ लक्ष रु. किमतीच्या शेतमालाची निर्गत केली. त्यांत डाळी, केळी, नारळ, खोबरे, कांदे, फळे व भाज्या ह्यांचा समावेश आहे.

### महागाईने उच्चांक गाठला

१९६६ चे मानाने १९६७ साली किंमतीत १५·३% वाढ झाली. एवढी वाढ ह्यापूर्वी कधीच झाली नव्हती. अन्नपदार्थांची किंमत २५·७% ने वाढली, त्यामुळे महागाई एवढी झाली.

### आत्मघाताची कारणे सर्वस्वी आर्थिक नसतात

आयुष्याला कंटाळून आत्महत्या केल्याच्या वार्ता वृत्तपत्रांतून येत असतात. भारतासारख्या गरीब देशात आर्थिक हलाखीमुळेच आत्मघाताचे प्रकार घडत असावेत असा समज आहे. अर्थात आर्थिक हलाखीची भर इतर संकटांत पडल्यास आत्मघाताची प्रवृत्ती बळावेल ह्यांत शंका नाही. ज्या देशात आर्थिक सुबत्ता असते तेथेही आत्मघात घडून येतातच. हिंदमध्ये गुजरात राज्यात आत्मघाताचे प्रमाण विशेषत: स्त्रियांत अधिक असल्याचे प्रसिद्धच आहे. इतर प्रांतांतील आत्मघाताच्या प्रकारासंबंधी नीटशी माहिती फारशी उपलब्ध नाही. गुजरात सरकारने मात्र आत्मघाताच्या प्रकारांची चौकशी करण्यासाठी एक चौकशी मंडळ नेमले होते. मंडळाचा अहवाल गेल्या साली प्रसिद्ध करण्यात आला आहे. अलीकडे आंध्र राज्याच्या मुख्य मंत्र्यांनी विधिमंडळात अशी माहिती सांगितली की, आंध्र प्रदेशात रोज ८ माणसे आत्महत्या करतात. ही माहिती खेदजनक तर आहेच; पण इतक्या आत्महत्या घडण्याच्या कारणांची चौकशी करण्या-इतकी गंभीर स्वरूपाचीही आहे. माणसांचे भावनात्मक जीवन जर समतोल नसेल तर त्यातून मानसिक अस्वस्थतेचा उगम होतो. अशी अस्वस्थता दीर्घकाल टिकली तर जीवनाचा शेवट करण्याची इच्छा उत्पन्न होऊन बळावत जाते. पण भावनात्मक जीवनाची चिकित्सा करून ते समतोल राखण्यासाठी कुशल मानसशास्त्रज्ञांची गरज असते. अमेरिकेसारख्या देशात मानसिक रोगांवर उपचार करणारे अनेक मानसशास्त्रज्ञ आहेत. भारतात मात्र अशा तज्ज्ञांची संख्या अवघी २०० आहे.

---

### चिंतनाच्या अभ्यासक्रमापासून आर्थिक फायदा

महर्षी महेश योगी ह्यांनी हृषिकेश येथे आध्यात्मिक चिंतन शिकविण्याचा एक वर्ग काढला होता. ह्या वर्गात शिक्षण घेऊन पुढे चिंतनाचे शिक्षण इतरांना देण्यासाठी शिक्षक तयार करण्यात यावयाचे होते. अभ्यासक्रमासाठी ७० परदेशी नागरिक निरनिराळ्या देशांतून आले होते. त्यांच्या भारतभेटीमुळे २८ हजार डॉलर्सची प्राप्ती झाली. प्रत्येक चिंतनशील विद्यार्थ्याला ४०० डॉलर्स फी द्यावी लागली. त्याशिवाय चिंतनाची दीक्षा घेताना प्रत्येक विद्यार्थ्याला आपले एका आठवड्याचे वेतन द्यावे लागले. ही रक्कम जिनिव्हा येथील आंतरराष्ट्रीय चिंतन-संस्थेकडे ठेवण्यात आली आहे. जगात सुख व शांती ह्यांचा प्रसार करण्यासाठी भारतामधून ५०० निष्ठावान कार्यकर्ते त्यांना पाहिजे आहेत. त्यासाठी ते एक परिषद भरविणार आहेत.

---

### केरळमधील ज्यूंचे देशांतर थांबले

केरळात १९०० वर्षांपूर्वी स्थाइक होण्यासाठी ज्यू आले; त्यांची संख्या २,००० पर्यंत झाली. गेल्या वीस वर्षांत त्यांतले १,७०० ज्यू इस्राएलला गेले. आता केरळमध्ये ३०० ज्यू उरले आहेत. ते सर्व सुस्थितीत आहेत. त्यांपैकी १५० लोक कोचीनमध्ये राहतात.

---

### जागतिक बँकेचे पाकिस्तानला प्रशस्तिपत्र

जागतिक बँकेचे एक प्रतिनिधिमंडळ गेल्या जानेवारीत पाकिस्तानच्या दौऱ्यावर गेले होते. पाकिस्तानच्या औद्योगिक प्रगतीची पाहणी करण्याचा मंडळाचा उद्देश होता. मंडळाने पाहणी पूर्ण झाल्यावर पाकिस्तानमधील आर्थिक स्थितीबद्दल अनुकूल अभिप्राय व्यक्त केला असून, १९६८–६९ सालातील संभाव्य प्रगतीचे आशादायक चित्र रेखाटले आहे. पाकिस्तानला मदत करणाऱ्या राष्ट्रगटाकडे अहवालाच्या प्रती धाडण्यात आल्या आहेत. ह्या गटाची बैठक पुढील महिन्यात वॉशिंग्टन येथे भरणार आहे. पाकिस्तान ह्या मदतगटाकडून ५५ कोटी डॉलर्सची मदत मिळविण्याची अपेक्षा करीत आहे. पाकिस्तानने आता भारताप्रमाणेच वार्षिक योजना आखण्यास सुरुवात केली आहे. १९६८–६९ च्या योजनेत ६७० कोटी रुपये सार्वजनिक विभागासाठी आणि ५०० कोटी खाजगी विभागासाठी मंजूर करण्यात आले आहेत.

---

### वन्य पशुधनाची किंमत समजत नाही

भारतामधील वन्य पशुपक्ष्यांचे निरीक्षण करण्यासाठी २६ ब्रिटिश नागरिकांची एक तुकडी भारतात आली आहे. वन्य पशुपक्ष्यांची अभयस्थाने म्हणून जाहीर करण्यात आलेल्या राखीव जंगलांना ही तुकडी भेट देत आहे. तुकडीचे पुढारी सर ह्यू इलिअट म्हणतात की भारतात विविध प्रकारचे पशुधन विपुल आहे. परंतु त्याची किंमत भारतीयांना अजून कळलेली नाही. कीनीआसारखा देश पशुपक्षी पाहण्यासाठी येणाऱ्या परदेशीय प्रवाशांपासून दरसाल १ कोटी पौंड मिळवितो. भारतात मात्र त्यांच्या संरक्षणासाठी फक्त खर्चच केला जातो. भारतामधील वन्य पशुपक्ष्यांचे नुसते चित्रसंग्रह काढले आणि तिकिटे काढली तरीसुद्धा कितीतरी परदेशीय चलनाची प्राप्ती होऊ शकेल. हिंदमधील पक्ष्यांचे चकाकणारे रंग युरोपिअन लोकांना फारच आकर्षक वाटतात.

---

### ग्रामीण भागात वीजपुरवठा : मद्रास सर्वांत पुढे; आसाम सर्वांत मागे.

मद्रास राज्यातील १४,१२४ खेड्यांपैकी ५४% खेड्यांत वीज आलेली आहे. ह्याउलट, आसाममधील २५,७०२ खेड्यांपैकी फक्त १२१ खेड्यांत (०·४७%) वीज आहे. इतर राज्यांतील वीज असलेल्या खेड्यांचे एकूण खेड्यांशी प्रमाण खालीलप्रमाणे आहे :– केरळ ४०·२५%, पंजाब २५·३०%, म्हैसूर १९·६०%, महाराष्ट्र १७·५०%, आंध्रप्रदेश १६·७५%, गुजरात १२·३०%, जम्मू व काश्मीर ९·७५%, उत्तर प्रदेश ९·४२%, बिहार ८·४८%, राजस्थान ५·२२%, प. बंगाल ३·७२%, मध्यप्रदेश १·८२%, नागालँड १·६०% आणि ओरिसा १·४४%.

---

## राजभवनांवर होणारा खर्च

घटक राज्यांतील गव्हर्नराची जागा मुळातच अनावश्यक आहे, अशी टीका करण्यात येत असते. शिवाय गव्हर्नर्स वाजवी-पेक्षा अधिक दिमाखात आणि डौलात राहतात असाही आरोप करण्यात येतो. गव्हर्नर व त्यांचा लवाजमा ह्या बाबींवरील खर्च वाढत चाललेला आहे हे मात्र खरे आहे. १९६६-६७ साली ८ लाख रुपयांची अधिक तरतूद राजभवनांसाठी करावी लागली. प्रत्येक राजभवनामागे दरसाल ३·५ लाखापासून १३ लाखापर्यंत खर्च करावा लागतो. देशाच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीत तर हा निष्कारण मोठा वाटतोच; पण एरव्ही-सुद्धा इतका खर्च अनावश्यक वाटल्यास नवल नाही. गव्हर्नरांना आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कमी इतमानाने राहिले तरी चालण्यासारखे आहे.

---

## रिकाम्या वेळाची आपत्ती कोसळणार

गेल्या शे-दोनशे वर्षांत भौतिक शास्त्राची विलक्षण प्रगती झाल्यामुळे माणसाचे जीवन सुखमय झाले आहे. तथापि अजूनही पोटापाण्यासाठी कष्ट केल्याशिवाय बहुसंख्य लोकांचे भागत नाही. आज जे रिकामे व ऐदी आहेत ते आपले जीवन फारसे चांगले घालविताना दिसत नाहीत. काही थोडे लोक रिकाम्या वेळाचा सदुपयोग करताना दिसतात; नाही असे नाही. असा हा रिकामा अगर फावला वेळ बहुसंख्य लोकांना अष्टौप्रहर मिळू लागला तर काय होईल हे सांगता येणे कठीण आहे. ही आपत्ती ठरेल की इष्टापत्ती? ते काहीही असो; अमेरिकेतील एका शास्त्रज्ञाने असे भाकित केले आहे की पुढील शतकांत माणसाचे जीवन आमूलाग्र बदलून जाणार आहे. सध्या माणसाला जे काम करावे लागते त्यापैकी ९५ टक्के काम राहणारच नाही किंवा ते यंत्रांकरवी उरकून घेण्यात येईल आणि सुखोपभोग घेण्याचे काम तेवढे माणसापुढे राहील. प्राचीन ग्रीस देशात स्वतंत्र नागरिक आणि गुलाम असे दोनच सामाजिक वर्ग होते. गुलाम सर्व कामे करीत असल्यामुळे स्वतंत्र नागरिकांना उपभोगाशिवाय दुसरे कामच नव्हते. तीच परिस्थिती पुढील शतकात जगात उत्पन्न होणार आहे. हे भाकित खरे ठरले तर त्या वेळचा माणूस अधिक सुखी होईल काय? रिकाम्या वेळेचा योग्य उपयोग करण्याचे शिक्षण देण्यात आले नसेल तर अशा परिस्थितीतून नवीनच प्रश्न निर्माण होण्याचाच अधिक संभव आहे. आज उद्योगशीलता हा मोठा सद्गुण मानण्यात येतो, पण काहीच करण्याची जरूर नसलेल्या समाजात ह्या सद्गुणाचा भाव नाहीसा होईल. आणि आळशीपणाला गुणाचा दर्जा आपोआपच प्राप्त होईल.

---

## परराष्ट्रखात्याच्या खर्चात ४३ लाखांची बचत

भारताची परराष्ट्रातील दैनंदिन कामे करण्यासाठी अनेक देशांत कचेऱ्या असतात. त्या कचेऱ्यांवर होणाऱ्या खर्चात ४३ लाख रुपयांची बचत करण्यात चालू साली खात्याला यश मिळाले आहे. ब्रिटनमधील इंडियन हाय कमिशनच्या कचेरीसाठी भारत दरसाल १·२ कोटी रुपये खर्च करीत असे. आता लंडनमधील कमिशनच्या कचेरीत काम करणाऱ्या लोकांच्या संख्येत कपात करण्यात आल्यामुळे सर्वांत अधिक बचत झाली आहे. परदेशातील कचेऱ्यांत कशी व किती बचत करता येईल ते सुचविण्यासाठी एक तपासणी मंडळ नेमण्यात आले होते. मंडळाच्या शिफारसींना अनुसरून काटकसरीचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. जगाच्या निरनिराळ्या भागांतील ८० देशांत भारताच्या मोठ्या कचेऱ्या आहेत. त्याशिवाय अनेक देशांत निरनिराळ्या अधिकाराच्या १०३ जागा आहेत. ह्या सर्व कचेऱ्यांचा व जागांचा मिळून सालीना ९·८ कोटी रुपयाचा खर्च आहे. पण त्यापैकी १·८८ कोटी रुपये ब्रिटन व अमेरिका ह्या देशांतील कचेऱ्यांवरच खर्च होत असतात. त्याशिवाय परराष्ट्रखात्याच्या मुख्य कचेरीवर ३·७७ कोटी रुपये खर्च होतात. वॉशिंग्टनमधील कचेरीवर ६४ लाख रुपये खर्च होतात. भारताचे संरक्षण खाते आणि पुरवठा खाते त्यांच्याही लंडनमध्ये मोठ्या कचेऱ्या आहेत. तपासणी मंडळाच्या मताने ह्या दोन्ही खात्यांच्या कार्यक्षमतेला कोणत्याही प्रकारची बाधा न आणता त्यांच्या लंडनमधील कचेऱ्यांचा खर्च कमी करता येण्यासारखा आहे. वरील दोन्ही खाती आपआपल्या कचेऱ्यांवरील खर्चात शक्य ती कपात करीत आहेत. परंतु तपासणी मंडळाच्या सर्वच शिफारसी त्यांना मानवण्यासारख्या नाहीत, असे म्हणतात.

---

## परिस्थितीचे आव्हान स्वीकारा

मुंबई गांधी स्मारक निधी वैकुंठ ल. मेहता स्मारक व्याख्यानात श्री. यू. एन. ढेबर ह्यांनी नवे कार्यकर्ते पुढे येण्यासाठी काय आवश्यक आहे, ह्याचे उत्कृष्ट विवेचन केले. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे बोलूकाका नकोत; करूकाका हवेत; केवळ भाषणे करणारे पुढारी नकोत; स्वतःचे उदाहरण समाजापुढे ठेवणारे पुढारी हवेत. दुसरी गोष्ट, स्वतःचे निर्णय घेऊन अमलात आणण्यास, चुका करण्यास, वाव हवा. तिसरी गोष्ट, कामगाराची देखभाल, त्याच्या खरोखरीच्या चुकांबद्दल जबाबदारी पत्करण्याची तयारी, त्याच्या व्यक्तित्वाबद्दल आणि मतांबद्दल आदर, त्याच्या गरजांचे आकलन आणि त्या शक्यतो भागविण्याची तळमळ, ही हवीत. देशातील सद्यःस्थितीचे खरेखुरे चित्र कामगारापुढे ठेऊन ते सुधारण्याचे मार्ग त्याच्याशी मोकळेपणाने चर्चिले पाहिजेत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, एकदा विचारपूर्वक निर्णय घेण्यात आला, म्हणजे मग शिस्त राखण्यात आलीच पाहिजे.

---

### परदेशीय शेती तज्ज्ञांकडून भारताची प्रशस्ती

शेतीच्या उत्पादनात क्रांती घडवून आणण्याचे जे प्रयत्न भारतात करण्यात येत आहेत त्यांची दोन परदेशीय तज्ज्ञांनी वाहवा केली आहे. दिल्ली येथील नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स ऑफ इंडिआ ह्या संघटनेपुढे बोलताना त्यांनी हिंदी शास्त्रज्ञांच्या कामाचा गौरव केला; पण त्याचबरोबर फाजील आशावादाविरुद्ध इशाराही दिला. मेक्सिको देशातील आंतरराष्ट्रीय गहू आणि मका संशोधन केंद्राचे डायरेक्टर डॉ. बोरलॉग हिंदमधील शेतीविषयी बोलताना म्हणाले की, भारतात दर एकरी अधिक पीक देणाऱ्या गव्हाची जात शोधून काढण्याची खटपट करण्यात येत आहे. शेतीच्या व्यवसायात नवी वाट शोधण्याचा हा क्रांतिकारी प्रयत्न आहे. तथापि ही क्रांती सातत्याने चालू ठेवण्यात येऊन अखेरच्या टप्प्यापर्यंत पोचविण्यात आली पाहिजे. त्यासाठी शेतीचा प्रश्न आर्थिक व सामाजिक दृष्टीने हाताळण्यात आला पाहिजे. परंतु त्याचबरोबर लोकांच्या मानसिक प्रकृतीचाही विचार करण्यात आला पाहिजे. गव्हाच्या नव्या जाती शोधताना यश आले तरी त्यामुळे हुरळून जाता कामा नये. कारण, नव्या जातीबरोबरच त्यावर पडणाऱ्या किडीचाही बंदोबस्त करण्याचे काम शास्त्रज्ञांना करावे लागेल. ह्या कामी आंतरराष्ट्रीय सहकार्याची फार गरज आहे. शेतीशी संबंधित असलेल्या जीवशास्त्राच्या बाबतीत तर अशा सहकार्याशिवाय मुळीच भागणार नाही. डॉ. बोरलॉग ह्यांनी शोधून काढलेल्या काही नव्या गव्हाच्या जातींमुळे गव्हाच्या शेतीत नवी वाट उजळली गेली असून अन्नधान्याच्या उत्पादनाच्या बाबतीत मेक्सिकोमध्ये क्रांती घडून आलेली आहे.

---

### लोकसंख्येच्या वाढीची इतकी भीती नाही

जगाची लोकसंख्या, विशेषतः दक्षिण अमेरिका, आशिआ व आफ्रिका खंडांची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने व अन्नपदार्थांचे उत्पादन त्या मानाने वाढत नसल्यामुळे १९७५ च्या सुमारास अनेक पौर्वात्य देशांत भयंकर दुष्काळ पडेल अशी भीती तज्ज्ञांनी व्यक्त केलेली आहे. तथापि अमेरिकेतील शिकॅगो विद्यापीठातील एका तज्ज्ञाने ही भीती अनाठायी असल्याचे मत व्यक्त केले आहे. त्याच्या मताने केवळ अमेरिकेतच नव्हे तर सर्वच जगात दर हजारी जननाचे प्रमाण घटत चालले आहे. अमेरिकेची लोकसंख्या २२ कोटींच्या आसपास स्थिर राहण्याची शक्यता आहे. त्याशिवाय दक्षिण कोरिया, भारत, पाकिस्तान, चीन, इत्यादी देशांतही जननसंख्या कमी होत चालली आहे. इ. स. २,००० पर्यंत जगाची लोकसंख्या नियंत्रित करण्यात यश येण्यासारखे आहे.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

### ब्रह्मदेशाला रेल्वेच्या डब्यांचा पुरवठा

टाटा गटाच्या कंपन्यांना रेल्वेचे ३३ डबे पुरविण्याची मागणी ब्रह्मदेशाकडून मिळालेली आहे. डबे अरुंद रूळावर चालणाऱ्या गाडीचे असून सुखद प्रवास होण्यासाठी मुद्दाम बनविण्यात याव-याचे आहेत. त्यांपैकी ४ डबे नुकतेच ब्रह्मदेशाला जलमार्गाने पाठविण्यात आले. उरलेले डबे येत्या मे महिन्यापर्यंत तयार करून पाठविण्यात येतील असा अंदाज आहे. ह्या डब्यांची मागणी १९६६ च्या मार्च महिन्यात नोंदण्यात आली होती. ती मिळविताना टाटा कंपनीला जपान, पश्चिम जर्मनी, बेल्जियम आणि ब्रिटन इतक्या देशांतील कारखानदारांशी स्पर्धा करावी लागली. जपानने मागितलेल्या किमतीपेक्षा भारताने सांगितलेली किंमत ३० टक्क्यांनी कमी होती. डब्यांत झोपण्याचे १९, फराळाचे ५ आणि टपाल नेण्याचे ४ डबे आहेत.

### अदबशीर हकालपट्टी

"तुमचा अभाव आम्हांला खूप जाणवेल; तुमच्या अभावी आमचे कसे काय चालेल हे काही कळत नाही. पण येत्या सोमवार पासून आम्ही प्रयत्न करणार आहोत."

### अग्रेसर कंपन्यांचा नफा वाढला नाही

भारतातील अग्रेसर १०१ पब्लिक लिमिटेड कंपन्यांचा एकत्रित विचार केला, तर १९६६–६७ मध्ये त्यांची एकूण विक्री २,०५८ कोटी रु. ची. झाली; १९६५–६६ मध्ये ती १,८४५ कोटी रु. ची झाली होती. ही ११·५% ची वाढ मुख्यतः किमती वाढल्यामुळे झाली; वाढलेल्या उत्पादनामुळे नव्हे. करपूर्व नफा १७४ कोटी रु. झाला; १९६५–६६ मध्ये तो १० लाखांनी जास्त होता.

### कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी जर्मनीची मदत

जगातील एकूण १·२ कोटी कुष्ठरोग्यांपैकी सुमारे २५ लक्ष भारतात आहेत. त्यातले ५०% कुष्ठरोगी मद्रास आणि आंध्र-प्रदेश येथे आहेत, असे जर्मन लेप्रसी रिलिफ असोसिएशनच्या डायरेक्टरांनी सांगितले आहे. प. जर्मनी कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी चालू वर्षासाठी १८·५ लक्ष रु. देणार आहे.

### कन्याकुमारी येथील विवेकानंद स्मारक

कन्याकुमारी येथील विवेकानंद स्मारकासाठी दुरुस्त अंदाजाप्रमाणे ५० लक्ष रु. खर्च येईल. आणखी १५ लक्ष रु. स्मारक नीट राखण्यासाठी आणि स्वामीजींचे कार्य पुढे चालविण्यासाठी बाजूस राखण्यात येतील. आतापर्यंत ३० लक्ष रु. जमले आहेत. स्मारकाचे उद्घाटन १९६९ मध्ये होऊ शकेल.

### कच्छ लवादासाठी भारताचा २७ लक्ष रु. खर्च

भारत–पाकिस्तानचा कच्छसंबंधीचा तंटा सोडविण्यासाठी नेमण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय लवाद मंडळाप्रीत्यर्थ १९६७-६८ मध्ये भारताचा २७ लक्ष रु. खर्च झाला.


तारेचा पत्ता "मॉर्गेज" मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१८९७
उपकार्यालय दूरध्वनी क्र. २५६५२७

**मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँक लि., मुंबई**

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, डुगल रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५६ कोटी येणे आहेत.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले, व्यवस्थापक
ये. स. बोरगांवकर, कार्यकारी संचालक



- व्यवस्थापत्र ( Settlement Deed )
- विश्वस्तपत्र ( Trust Deed )
- मृत्युपत्र व्यवस्था
- सार्वजनिक, धर्मादाय संस्था अगर निधी यांचे व्यवस्थापन
- मौल्यवान वस्तूंचा सांभाळ
- घराची भाडेवसुली, खरेदी व विक्री
- विमा वसुली
- विविध नुकसान भरपाई मिळवून देणे

आदि विविध कामे

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड**

आपल्या
दि वेस्टर्न इंडिया
ट्रस्टी अँड एक्झिक्यूटर कंपनी लि.
ह्या संलग्न ( सबसिडिअरी कंपनीमार्फत )
करीत असते.

### बनावट नोटा करण्याची गंभीर प्रकरणे

बनावट चलनी नोटा आणि नाणी मोठ्या प्रमाणावर तयार करण्याची अनेक प्रकरणे चित्रदुर्ग, धारवाड, विजापूर, दक्षिण कारवार, तुमकूर, उत्तर कारवार, रायचूर, कोलार, म्हैसूर, शिमोगा, गुलबर्गा आणि बलेरी जिल्ह्यांतून उघडकीस आली आहेत. पकडलेल्या लोकांत असेंब्लीचा एक भूतपूर्व सभासद, दोन उद्योगपती, एक सरकारी नोकर, एक पोलीस, एक साधू आणि सहकारी सोसायट्यांचे तीन सभासद आहेत. बनावट नोटा छापून भारतात त्या प्रसृत करण्याचा उद्योग चीन करीत आहे किंवा काय, ह्याची चौकशी व्हायला पाहिजे, असे म्हैसूरच्या गृहमंत्र्यांनी सांगितले.

### ला. इ. कॉर्पोरेशनचे काम

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनने ३१ मार्च, १९६८ अखेर संपलेल्या वर्षी ८४४·५१ कोटी रुपयांच्या १४·३१ लक्ष विमा पॉलिसी दिल्या. गेल्या वर्षीपेक्षा ७४·२४ कोटी रुपयांचे काम अधिक झाले.

### व्यापारी फर्म्समधील लष्करी उच्च अधिकारी

गेल्या दोन वर्षांत, सरकारची परवानगी घेऊन ६७ उच्च लष्करी अधिकाऱ्यांनी व्यापारी फर्म्सची नोकरी पत्करली. त्यात ५ मेजर जनरल, २८ ब्रिगेडिअर, १७ कर्नल, १ कमोडोर, ३ कॅप्टन ( नाविक ), ५ एअर कमोडोर, ६ ग्रुप कॅप्टन आणि १ लेफ्टेनंट जनरल व १ एअर व्हाइस मार्शल ( मेडिकल ) आहेत.

### नॅशनल टेक्स्टाइल कॉर्पोरेशन

सरकारी मालकीच्या ह्या नव्या कंपनीची स्थापना अडचणीत सापडलेल्या गिरण्या घेणे, नवीन गिरण्या स्थापून चालविणे, सर्व तऱ्हेचे सूत तयार करणे व त्यांची खरेदी-विक्री करणे, इतर फर्म्सशी भागीदारी करणे, इत्यादी उद्देशाने करण्यात आली आहे. कॉर्पोरेशनचे अधिकृत भांडवल १० कोटी रु. आहे.


### अनौरस संततीला काल्पनिक बाप मिळणार

रशियात ९ एप्रिलपासून अमलात आलेल्या कायद्याप्रमाणे, अनौरस संततीच्या जन्माचे दाखल्यात काल्पनिक बापांची नावे लिहिली जातील. कामगार स्त्रीने घटस्फोट घेतला आणि तिच्या नवऱ्याला काम करणे शक्य नसेल तर त्याला पोटगी द्यावी लागेल. गर्भार पत्नीकडून ती गर्भार असताना आणि त्यानंतर एक वर्षपर्यंत पतीला घटस्फोट मागता येणार नाही.

### आणखी चार शहरांतून टेलिव्हिजन

सध्या दिल्ली येथे टेलिव्हिजन आहे; मुंबई, कलकत्ता, मद्रास आणि कानपूर येथेही ह्यापुढे टेलिव्हिजन सुरू होईल. १९६९ च्या एप्रिलनंतर हा कार्यक्रम हाती घेतला जाईल.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्ट
कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : ९, बँक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.
: विभागीय कचेरी : महाल नागपूर.

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. | ६,१३,४५,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. | ५,७२,४१,००० |
| ठेवी | ... | रु. | ५०,९५,६३,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. | १,०६,६५,९६,००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( पूर्व ) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

**क्रांतिकारकांचे स्मारक**—ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र क्रांतीचे प्रयत्न करणाऱ्या भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि बी. के. दत्त ह्या चार क्रांतिकारकांचे फेरोझपूर जिल्ह्यातील हुसेनीवाला ह्या खेड्यात स्मारक उभारण्यात आले आहे. स्मारकासाठी १ लाख, ८५ हजार रुपये खर्च आला आहे. पंजाब सरकारने १९६१ साली स्मारकाची कल्पना स्वीकारली होती.

**मुंबईत आणखी एक लक्ष लोकांना टेलिफोन हवेत**—मुंबई शहरात १,००,००० लोक टेलिफोनसाठी अर्ज मंजुरीची वाट पहात आहेत.

**लोखंडी नळांची निर्यात**—भारताने जपानला पक्क्या मालाची निर्यात करण्यास प्रथमच प्रारंभ केला आहे. कलकत्ता शहरातील एका एंजिनिअरिंगच्या कारखान्याने १० लाख रुपयांचे लोखंडी नळ व तदनुषंगिक साहित्य जपानला पुरविण्याचे कंत्राट मिळविले आहे. पुरवठ्याच्या कराराप्रमाणे जपानला माल पाठविण्यास प्रारंभही झाला आहे. प्रयत्न केल्यास जपानला आणखीही काही पक्का माल विकता येण्यासारखा आहे.

**गौळवाड्याला डेन्मार्कची मदत**— गुजरातमधील आनंद ह्या ठिकाणी गौळवाड्यातील कामाचे शिक्षण देण्याचे एक केंद्र उभारण्यात येणार आहे. शिक्षण केंद्रासाठी डेन्मार्ककडून १३ लाख रुपयांची मदत मिळणार आहे. गेल्या वर्षी काही डॅनिश दुग्धव्यावसायिकांनी आनंदला भेट दिली होती. त्यांच्या सल्ल्याने ही तांत्रिक साह्याची योजना आखण्यात आली आहे.

**बिहारमध्ये भरघोस पिके**—बिहार राज्यात चालू हंगमात रब्बीची पिके भरघोस येतील अशी अपेक्षा आहे. राज्यात ४ लाख, ५० हजार एकर जमिनीत अधिक पीक देणारे गव्हाचे बियाणे वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे गव्हाचे दर एकरी उत्पादन ५० ते ६० मण येण्याची शक्यता आहे. त्याशिवाय इतर पिकेही चांगली येतील असे दिसत आहे.

**रेल्वेसाठी जर्मनीचे कर्ज**—जर्मन डेव्हलपमेंट बँक आणि भारत ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणे बँक भारतामधील रेल्वेसाठी १.६ कोटी मार्क्स अथवा ३.०४ कोटी रुपये कर्ज देणार आहे. डिझेल एंजिने तयार करण्यासाठी लागणारे काही भाग आणि सिग्नलची काही सामग्री घेण्यासाठी कर्जाचा विनियोग होईल.

**भाषिक दंगलीची किंमत**—गेल्या डिसेंबर महिन्यात मद्रास राज्यात हिंदी भाषाविरोधी आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले होते. आंदोलनात झालेल्या दंगलीचा रोख मुख्यतः रेल्वेमार्गावर होता. २१ रेल्वे स्टेशनांना दंगलीमुळे हानी सोसावी लागली. ह्या स्टेशनांतील १३ लाख रुपयांच्या मालमत्तेची हानी झाली. त्याशिवाय पोस्ट खात्याच्या मालमत्तेचेही नुकसान झाले.

**चित्रपटगृहांचे राष्ट्रीयीकरण**—पंजाबमधील चित्रपटगृहांचे राष्ट्रीयीकरण करण्यात येणार असल्याची वार्ता आहे. चित्रपटगृहे राष्ट्रीय मालकीची झाली तर त्यापासून राज्याला दरसाल २ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळेल असा अंदाज राज्य सरकारने केला आहे. पंजाब राज्यात सुमारे १३० चित्रपटगृहे आहेत. त्यांचे राष्ट्रीयीकरण झाल्यास तसे करणारे पंजाब हे भारतामधील पहिलेच राज्य ठरेल.

---

### फोन करण्यात दिनेशसिंग अग्रेसर

मध्यवर्ती मंत्र्यांनी ३० सप्टेंबर, १९६७ अखेरच्या सहा महिन्यात टेलिफोनवर बोलण्यासाठी १,४८,८४३ रु. खर्च केले. व्यापारमंत्री, दिनेशसिंग ह्यांचे टेलिफोनचे बिल सर्वात जास्त (१९,४४२ रु.) झाले, तर दळणवळण मंत्री राम सुभगसिंग ह्यांचे सर्वात कमी (१,९४५ रु.) झाले. पंतप्रधान इंदिरा गांधींचे टेलिफोन बिल १५,७१३ रु. झाले.

---

### पाकिस्तानकडून भारतामधील दरवडेखोरांना शस्त्रांचा पुरवठा

मध्यप्रदेशातील चंबळ नदीचे खोरे दरवडेखोरांच्या वसतीबद्दल प्रसिद्ध पावलेले आहे. निसर्गतःच दुर्गम असलेल्या ह्या भागात रस्ते फारसे नाहीत. जमीन सुपीक असली तरी पिके पावसाच्या लहरीवर अवलंबून. भूरचना गुन्हेगारांना लपण्यास सोयीची. ह्या भागातील दरवडेखोरांचा इतिहास ब्रिटिश राज्य येण्यापूर्वीपासूनचा आहे. मध्यप्रदेश, राजस्थान आणि उत्तरप्रदेश राज्यांच्या पोलिसांनी दरवडेखोरांना काबूत ठेवले असले तरी त्यांचे संपूर्ण उच्चाटन अद्याप झालेले नाही. चंबळ खोऱ्यातील दरवडेखोरांना पाकिस्तानातून शस्त्रास्त्रांचा पुरवठा होत असतो अशी माहिती मध्यप्रदेशाचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस ह्यांनी अलीकडेच दिली आहे. ह्या भागातील दरवडेखोरांना शस्त्रास्त्रांचा बाहेरून पुरवठा होत असल्याच्या वार्ता बऱ्याच वेळा आलेल्या आहेत. त्यावरून असे अनुमान काढण्यात येत आहे की दरवडेखोरांची माणसे पाकिस्तानात जाऊन नियमितपणे शस्त्रास्त्रे आणीत असावीत. सरहद्दीपलीकडे असणारे पाकिस्तानी नागरिक हा व्यापार करण्यास उत्सुक असले पाहिजेत. दरवडेखोर नव्या शस्त्रास्त्रांसाठी मोठी किंमत देण्यास तयार असतात. एका ब्रेनगनसाठी १५ हजार रु. आणि स्टेनगनसाठी ४ हजार रुपये देण्याची त्यांची तयारी असते. भारताच्या सरहद्दीवरील समाजविघातक चळवळींना पाठिंबा देण्यात पाकिस्तानचा राजकीय स्वार्थही साधतो. सरहद्दीवरील असंतुष्टांना चिथावणी देऊन भारतीय प्रदेश कुरतडत बसण्याचे पाकिस्तानचे धोरण त्यावरून स्पष्ट दिसते. हिंदी संघराज्य आतून पोखरण्याचे हे तंत्र पाकिस्तानी चीनकडून शिकले आहेत.

# नहीं –
# यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



सोडा वाटर यंत्र    घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: [illegible]


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.